आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२७ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- रशिया-युक्रेन संघर्षावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद

- वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक आणि कार्यालयीन सुरक्षिततेसाठी सूचना नोंदवण्याकरता आरोग्य मंत्रालयाकडून नवीन वेब पोर्टल सुरु

- कोलकाता इथल्या महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी आंदोलन करणारे विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये संघर्ष / विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या विरोधात भाजपातर्फे उद्या पश्चिम बंगाल बंद

- महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक संजय पांडे यांच्यासह सहा जणांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल

- **आणि**

- महाराष्ट्राच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ, विविध धरणांमधून विसर्ग सुरू

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्याशी रशिया-युक्रेन संघर्षावर आज दूरध्वनीद्वारे संवाद साधला. धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्याविषयी चर्चा केल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टद्वारे सांगितलं. नुकत्याच झालेल्या युक्रेन भेटीतल्या अनुभवाविषयीही पुतीन यांच्याशी चर्चा केल्याचं त्यांनी सांगितलं. संघर्षावर लवकरात लवकर आणि शांततापूर्ण तोडगा काढण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही मोदी

यांनी केला.

**<><><><><>**

वैद्यकीय व्यवसायातल्या व्यक्तींची सुरक्षा आणि त्यांच्या कामाच्या ठिकाणची परिस्थिती सुरक्षित रहावी याकरता शिफारशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या राष्ट्रीय कृती दलाची पहिली बैठक आज नवी दिल्लीत झाली. कॅबिनेट सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या कृती दलाकरता सूचना नोंदवण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं “Suggestions to NTF” या नावाने नवीन पोर्टल सुरु केलं आहे.

यासंदर्भात राज्यसरकारांनी आपापल्या राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांमधे किंवा रुग्णालयांमधे केलेल्या सुरक्षा उपाययोजनांची माहितीही आरोग्य मंत्रालयानं मागवली आहे. यासंदर्भात विविध संबंधितांनी आपल्याकडे व्यक्तिशः सूचना केली असून आतापर्यंत ३०० ते ४०० सूचना मिळाल्या असल्याचं कृती दलाच्या सदस्यांनी बैठकीत सांगितलं. कृती दलाची बैठक उद्या दूरदृष्यप्रणालीद्वारे होणार आहे. सुरक्षेसाठी तात्काळ करण्याच्या उपाययोजनांवर त्यावेळी चर्चा होईल. केंद्रीय आरोग्य सचिव आणि केंद्रीय गृह सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील तसंच सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक त्यात सहभागी होतील.

**<><><><><>**

कोलकाता शहराच्या काही भागांमध्ये आज आंदोलनकर्ते आणि पोलिस यांच्यात संघर्ष झाला. पोलिसांनी लावलेले अडथळे तोडून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना रोखण्यासाठी, तसंच जमाव पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रुधूर, पाण्याचे फवारे आणि लाठीमार केला. परिस्थिती आटोक्यात ठेवण्यासाठी मोठा फौजफाटा इथं तैनात करण्यात आला आहे. आरजी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि खून प्रकरणी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी करत विद्यार्थी

रस्त्यावर उतरले. पोलिसांनी त्यांना परवानगी नाकारली, मात्र तरीही विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला. सध्या कोलकात्यात तणावपूर्ण वातावरण आहे. दरम्यान, मोर्चात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांविरुद्ध पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या विरोधात भारतीय जनता पक्षानं पश्चिम बंगालमध्ये उद्या सकाळी ६ वाजल्यापासून १२ तासांचा बंद पुकारला आहे.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर आणि ब्राझीलचे परराष्ट्र मंत्री माऊरो व्हिएरा यांच्या अध्यक्षतेखाली आज नवी दिल्लीत भारत- ब्राझील संयुक्त आयोगाची ९ वी बैठक झाली. बैठकीदरम्यान, दोन्ही बाजूंनी व्यापार, संरक्षण, ऊर्जा, आरोग्य, कृषी, अंतराळ आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातल्या सहकार्यासह द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेतला. ब्राझीलकडे G-20 चे अध्यक्षपद असून ब्राझीलच्या G-20 अध्यक्षपदासाठी भारताचं समर्थन असल्याचं त्यांनी नमूद केलं. न्याय्य आणि शाश्वत जग ही G-२० शिखर परिषदेची संकल्पना असून यावर आधारित उपक्रमांचे त्यांनी कौतुक केलं. G-20 शिखर परिषद या वर्षी १८ ते १९ नोव्हेंबर दरम्यान रिओ दि जानेरो इथं होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक संजय पांडे यांच्यासह सहा जणांविरुद्ध, जबरदस्ती आणि बेकायदेशीर कृत्यांच्या आरोपांवरून ठाणे नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मुंबईतले व्यावसायिक संजय पुनामिया यांच्या तक्रारीवरून हा काल गुन्हा दाखल केला असल्याचं ठाण्याचे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी सांगितलं.

पांडे यांच्याखेरीज, निवृत्त सहायक पोलिस आयुक्त सरदार पाटील, पोलीस निरीक्षक मनोहर पाटील, तसंच इतरांमध्ये श्यामसुंदर अग्रवाल, शुभम अग्रवाल आणि शरद अग्रवाल यांचा समावेश आहे. खोट्या तक्रारी नोंदवण्याच्या धमक्या

देणं, पैसे उकळणं, खोटे दस्तऐवज तयार करून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करणं इत्यादी आरोप त्यांच्यावर आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात येत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे

**<><><><><>**

राष्ट्रात आज दहीकाल्याचा सण उत्साहात साजरा होत असून विशेषतः मुंबई, ठाण्यात ठिकठिकाणी गोविंदाचा थरार रंगला. अनेक दिवसाच्या सरावानंतर गोविंदा पथकं उंचच उंच बांधलेल्या दहीहंड्या फोडत आहेत. या दहीहंड्यांसाठी लाखो रुपयांची बक्षिसंही लावली आहेत. अनेक थरांचे हे मानवी मनोरे पाहण्यासाठी जागोजागी गर्दी पाहायला मिळाली. दहीहंडी संस्कृतीसाठी प्रसिद्ध असलेल्या गिरगांव भागात विविध सामाजिक विषयांवर भाष्य करणारे चित्ररथ आज काढण्यात आले. यंदा महिलांवर होणाऱ्या अत्याचारांवर याद्वारे प्रामुख्याने भाष्य करण्यात आलं. अंधेरीतल्या वेसावे कोळीवाड्यात पुरातन परंपरेप्रमाणे लाकडी काठीला टोकदार अणकुचीदार भाला बांधून भाल्यानं दहीहंडी फोडण्यात आली.

दहीहंडी उत्सवादरम्यान नागरिकांच्या करमणुकीसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. ठाण्यात पाचशेपेक्षा अधिक गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडण्यासाठी हजेरी लावली. नाशिकच्या पुरातन मुरलीधर मंदिरासह इतरत्र श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळत आहे. नागपूरच्या दहीहंडी उत्सवात भंडारा, गोंदिया इथून आलेल्या गोविंदा पथकांनीही भाग घेतला.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या अनेक भागात मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यात राधानगरी, गगनबावडा, आजरा आणि चंदगड तालुक्यात अतिवृष्टी झाली असून, धरण क्षेत्रातही जोरदार पाऊस होत आहे. सर्वच

धरणं पूर्ण क्षमतेने भरली असून, पाण्याचा विसर्ग वाढल्याने नद्यांच्या पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. पंचगंगा नदीचं पाणी पात्राबाहेर आल्यानं ४२ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**सातारा** जिल्ह्यातल्या कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस होत असल्यामुळे धरणांमध्ये पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे आज कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाचे दोन्ही संच सुरू करण्यात आले असून, दोन हजार शंभर घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाणी नदीपात्रात सोडण्यात येत आहे. यामुळे कोयना नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात** पैठण इथल्या जायकवाडी धरणाचा पाणी साठा ५६ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या अहमदनगर तसंच नाशिक जिल्ह्यातल्या पाणलोट क्षेत्रातून ८४ हजार ४४६ घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याची आवक होत आहे.

**नाशिक** जिल्ह्यात गेल्या तीन ते चार दिवसांपासून जोरदार पाऊस असून इगतपूरी आणि त्र्यंबकेश्वर येथे अतिवृष्टी झाली होती. मात्र, आता पावसाचा जोर कमी झाला आहे. गंगापूर धरणातून काल रात्रीपर्यंत ९ हजार ४५० क्युसेक प्रवाह सुरू होता तो आता १ हजार २०४ क्युसेक इतका करण्यात आला आहे. त्यामुळे नदीचा पूर ओसरण्यास सुरुवात झाली आहे. दारणा धरणातून ५ हजार ८४८ तर नांदूर मध्यमेश्वर धरणातून ४५ हजार ७६९ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे

**<><><><><>**

**दक्षिण गुजरात, सौराष्ट्र, आणि कच्छमध्ये** काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. **उत्तर गुजरात आणि दक्षिण राजस्थानत** आज काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर **कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड** आणि **बिहारमध्ये** काही ठिकाणी उद्यापर्यंत जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, येत्या ३० तारखेपर्यंत **गुजरात, आणि महाराष्ट्राच्या उत्तर** किनारपट्टीजवळ समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता असल्यानं मच्छिमारांना समुद्राच्या न जाण्यचा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**